---

प्रकरण पहिले

आत्मचरित्र : स्वरूप आणि एकोणिसाव्या शतकातील आत्मचरित्रांची वाटचाल.

---

आत्मचरित्र हा कथा, कादंबरी, आदी वाङ्‌मय प्रकारांपेक्षा वास्तवाला अधिक प्रमाणात सामोरा जाणारा वाङ्‌मय प्रकार आहे.

आणि त्यामुळे वाचकाच्या मनावर प्रभाव गाजविण्याचे आणि जीवन-दर्शनाचे त्याचे सामर्थ्य मोठे आहे. आत्मचरित्र म्हणजे हाडामासांच्या माणसांनी जगलेल्या जीवनाची कहाणी. विविध प्रकृतीची, विविध ध्येयांनी प्रेरित झालेली, विविध प्रकारच्या जाणिवा असलेली माणसे, जीवनाच्या विशिष्ट वळणावर येऊन थांबतात तेव्हा सुख-दु:ख, ध्येयपूर्ती, ध्येयभंग, सामाजिक विरोध आणि सहयोग यांनी भरलेले आपले गतजीवन नजरेपुढे आणावे आणि अनेक वर्षांनंतरही मनात घर करून राहिलेल्या घटना, प्रसंग, व्यक्ती यां विषयी काही लिहावे, सांगावे असे वाटत असते. यातल्या काही गोष्टी हव्याशा व काही गोष्टी नकोशाही असू शकतात. आत्मचरित्रकाराला यातील जे काही सांगावेसे वाटते ते तो मनमोकळेपणाने, तटस्थपणाने, आणि प्रांजळ-पणाने आत्मचरित्रात सांगत असतो. निदान त्याने तसे सांगावे अशी अपेक्षा असते. काही माणसे आपल्या काळावर, समाजजीवनावर, आपल्या व्यक्तिमत्त्वाची आणि कर्तृत्वाची छाप उमटवून जातात व स्मरणीय ठरतात. तर काही माणसे सामाजिक जीवनात विरघळून जातात. त्यांच्या अस्तित्वाच्या साक्षीही उरत नाही. पण या दोनही प्रकारांच्या माणसांजवळ सांगण्यासारखे निश्चितच काही तरी असते. हे काहीतरी म्हणजेच आत्मचरित्रातून प्रतीत होणारे जीवन चैतन्य ( life force) त्यामुळे इतर सर्व ललितवाङ्मयप्रकारापेक्षा आत्म-चरित्राचे वेगळेपण लक्षात राहते.

आत्मचरित्र म्हणजे स्वत: लेखकाने आपल्या जीवनाची सांगितलेली कहाणी. डॉ. डी.जी.नाईक यांनी ' Autobiography in its simplest definition is the story of one's life written by oneself '[1] अशी आत्मचरित्राची व्याख्या केली आहे.

पण आत्मचरित्र हे घटनांचे केवळ निवेदन नसते. तर त्यांचे सिंहावलोकनही असते. ' The account of an individual human life written by the subject himself '(2) हे लक्षात घ्यावयास हवे. अनुभवांच्या अनेक आकार प्रकारांनी आणि गुंत्यांनी भरलेले मानवीजीवन जसे वैविध्यपूर्ण असते तसे अनेकदा ते गूढही राहाते. आत्मचरित्र लेखन करताना या गूढत्वाचाही शोध एखादा समर्थ लेखक घेऊ शकतो. तसेच आत्मचरित्रात केवळ एका व्यक्तीच्याच मनाचे प्रतिबिंब उमटलेले असते असे नव्हे तर ज्या समाजात तो लेखक राहातो त्या समाजाचेही प्रतिबिंब त्यात उमटलेले असते. व्यक्तिगत जीवनातील आशा-आकांक्षा, यशापयश या सोबतच त्या समाजाची मन:प्रकृती, त्या समाजातील संकेत, जीवनधारणा, त्यामधील नव्याजुन्यांचे संघर्ष, त्यातील श्रध्दा आणि अंध:श्रध्दा, समाजाच्या विविध क्षेत्रांतील आंदोलने या सर्वांचेच प्रतिबिंब त्यात उमटलेले असते आणि त्यामुळे व्यक्तीसोबत तत्कालीन समाजजीवनाचा पटही आत्मचरित्रातून उलगडला जात असतो. म्हणून अनेकदा आत्मचरित्राला दस्तऐवजाचे महत्त्व प्राप्त होते.

आत्मचरित्रात केवळ व्यक्तीच्याच मनाचे नव्हे तर, समाजमनाचेही प्रतिबिंब उमटलेले असते. सेफन्सी म्हणतात ' An Autobiography is not only a reflection of an individual mind, but also a reflection of the state of social conciousness'(3) कोणतीही व्यक्ती आपल्या समाजजीवनापासून आणि गुणधर्मापासून फार दूर जाऊ शकत नाही. आत्मचरित्रकाराच्या मनावर कळत न कळत त्याच्या समकालीन समाजजीवनाचे, युगधर्माचे पडसाद उमटलेले असतात. त्याच्या व्यक्तिगत जीवनात, भावसंघर्षात, सामाजिकतेचाही एक पदर गुंफलेला असतो.

लेखकाने सांगितलेली स्वत:च्या जीवनाची कहाणी म्हणजे आत्मचरित्र ही व्याख्या लक्षात घेता आत्मचरित्र हा वाङ्‌मयप्रकार जितका सोपा वाटतो तितकाच अवघडही आहे. आत्मचरित्र लिहिण्यासाठी कथा, कादंबरी, नाट्यादी वाङ्‌मय प्रकारांप्रमाणे कल्पनाशक्तीची गरज नसते. तसेच शास्त्रीय लेखनासाठी आवश्यक असणाऱ्या कुशाग्र बुध्दिमत्तेची व व्यासंगाचीही गरज नसते. आपल्या जीवनाची कहाणी जशी आठवते, जशी भावते, तशी सांगणे या अर्थाने ती सोपी वाटणे स्वाभाविक आहे. पण आपली कहाणी आपणच लिहिताना अनेक प्रश्न निर्माण होऊन तिचे लेखन कठीण बनते. उत्तम कलाकृती निर्माण करण्याकरिता लेखकाची लेखनविषयासाठी आवश्यक असणारी समरसता आत्मचरित्रामध्येच ( इतर वाङ्‌मय प्रकारांच्या तुलनेने) अधिक आढळते. पण येथेच खरा प्रश्न निर्माण होतो. समरसतेसोबतच स्वत:कडे तटस्थपणे पाहण्याचे व आत्मपरीक्षण करण्याचे सामर्थ्य, स्वत:चे दोषही गुणांइतक्याच मोकळेपणाने मांडण्याचे मनोबल त्याच्या ठिकाणी असायला हवे. स्वत:कडे असे तटस्थ पहाणे फारच थोडया लोकांना जमते. हे लक्षात घेता आत्मचरित्राचे लेखन कठीण ठरावे, हे स्वाभाविक आहे.

आत्मचरित्र म्हणजे संपूर्ण जीवनाचा आढावा नसला तरी गतस्मृतींना उजाळा देऊन जीवनातील ठराविक घटनाच त्यात सांगितलेल्या असाव्यात. हे आत्मकथनसुध्दा विशिष्ट पध्दतीने व्हावे, त्यात जीवनचित्रण असावे, व त्याची मांडणी कलात्मकतेने केलेली असावी. असे असले तरी, आत्मचरित्रापाठीमागे `स्व` जीवनाचे विवेचन करणे हेच तत्त्व असते. `स्व` जीवनाचे चित्रण करताना या `स्व` चे इतर लोकांशी आलेले संबंध, `स्व` शी संबंधित असलेल्या इतर घटना, त्याचप्रमाणे `स्व` ने केलेले तत्कालीन समाजाचे निरीक्षण व या सर्वांच्या `स्व`-

वर झालेला परिणाम या सर्वांतूनच आत्मचरित्राला मूर्त आकार येतो. वाङ्मयीन सौंदर्य प्राप्त होते. या संदर्भात इनसायक्लोपीडिया ब्रिटानिका मध्ये म्हटले आहे की,

......... ' It (autobiography) must attempt to survey, in retraspective mood, a considerable portion of life, if not an entire life, and it must take the form of an ordered narrative, with deliberate selection and shaping of material (though not constructed as fiction) to compose an artistic whole. Above all, its underlying principle must be scruting of the self, with outside happenings, persons, encountered, and observations, admitted, primarily as they impinge on the consciousness of the person on whose character and actions the writing is focused. '(4)

## आत्मचरित्र लेखनामागील भूमिका :

आत्मचरित्र लिहिणे म्हणजे धाडसीपणाने जीवनातील सत्य सांगणे होय. व्यक्तिमत्त्वाची सत्यबाजू सांगणे ही आत्मचरित्र लेखनामागची भूमिका असते. या संदर्भात आंद्रे मार्वांचे मत आत्मचरित्रालाही लागू पडते. 'That biography is a courageous search for truth. Its aim is the truthful transmission of personality. '(5) आत्मचरित्राच्याद्वारे लेखक व्यक्तिमत्त्वाचे प्रकटीकरण करीत असतो. आपल्या जीवन-कहाणीच्याद्वारे आपल्या मन:प्रवृत्तीच लोकांपुढे उघडया करून दाखवत असतो. आत्मचरित्र हे मनुष्याच्या विचार व भावना यांना

वाट करून देणारे साधन असते. मनुष्याला जीवनप्रवासात जे बरेवाईट अनुभव येतात ते लोकांना सांगून टाकले म्हणजे त्याला आपले हृदय हलके केल्यासारखे वाटते. आपल्या आयुष्यातील दु:खद व सुखद प्रसंग कोणाला तरी सांगावे व आपले मन मोकळे करावे हीच आत्मचरित्रकाराची भूमिका असते.

आत्माविष्कार ही कलावंताची स्वाभाविक प्रवृत्ती आहे. कविता, कादंबरी या वाङ्मयप्रकारांपेक्षा आत्मचरित्रातील आत्माविष्कार हा अधिक प्रमाणात होणारा असला तरी त्याचे स्वरूप स्वयंकेंद्रित असते, हे नाकारता येत नाही. ही स्वयंकेंद्रितता आणि आत्मपरता यांची बंधने ओलांडून आत्मचरित्रकाराला पुढे जावे लागते. आत्मनिष्ठा आणि वस्तुनिष्ठा या दोहोंच्यामधील समतोल ज्याला चांगला राखता येईल त्यालाच चांगले आत्मचरित्र लिहिता येणे शक्य आहे असा संयमशील तटस्थपणा हे आत्मचरित्राचे बलस्थान आहे.असे असले तरी, आत्मचरित्रलेखनामागील सर्वांचीच भूमिका सारखी असते असे नाही.

आपल्या आत्मचरित्रामागील भूमिका सांगताना मालतीबाई बेडेकर म्हणतात, ‘या अत्यंत दु:खाच्या व उद्विग्नतेच्या काळात मनाला केवळ विरंगुळा म्हणून मी या माझ्या आयुष्यातील आठवणी लिहायला घेतल्या. मी लेखन करीत असले की, रोजच्या जीवनातल्या सुखदु:खाचा मला काहीकाळ विसर पडतो.’(६)

आत्मचरित्रलेखनामुळे मनुष्याला क्षणभर आपल्या दु:खाचा विसर पडण्यास मदत होते. ‘रूसो’ आपल्या आत्मचरित्रात म्हणतो ' How do I love from time to time, to return to those moments of my youth, which were so charmingly delightful,

so short, so scarce and enjoyed at so cheap a rate ! how fondly do I wish to dwell on them ! even yet the remembrance of these scenes warms my heart with a chaste rapture, which appears necessary to reanimate my drooping courage and enable me to sustain the weariness of my latter days. '(7) जुन्या आठवणी म्हातारपणी मनुष्याला धीर देतात आणि दु:खाचा विसरही पाडतात. गतस्मृतींना उजाळा देताना एक प्रकारचा विशुध्द आनंद मिळत असतो. असा आनंद प्राप्त करून घेणे हा आत्मचरित्रलेखनाचा मुख्य उद्देश असतो.

आपणाला आलेल्या अनुभवातून इतरांनी काही तरी बोध घ्यावा, त्यांना शिकवण मिळावी, या भूमिकेतूनही आत्मचरित्रे लिहिली जातात. या संदर्भात ल.रा.पांगारकर 'चरित्रचंद्रा'त (१९३८) म्हणतात, "माझ्या चरित्रात कोणासही काही घेण्यासारखे नाही असे मला वाटते तर, हे चरित्र लिहून प्रसिध्द करण्याचा हा उद्योग मी केला नसता."(८) पांगारकरांची बोधवादी भूमिका यातून स्पष्ट होते. स्वत:च्या जीवनातून इतरांना खूप काही शिकता येईल, असे सांगण्याचाच त्यांचा उद्देश आहे.

काहीवेळा ही बोधवादी भूमिका सोडून केवळ गतायुष्याचे सिंहावलोकन करावे या भूमिकेतूनही आत्मचरित्र लिहिली जातात. हे सिंहावलोकन करताना त्याच्या आयुष्यातील दु:खद व सुखद आठवणींना उजाळा मिळतो. गतआठवणींच्याकडे तो तटस्थपणाने पहात असतो, व त्यातून त्याच्या मनाला एक प्रकारचे समाधान मिळते. इतिहासलेखनाच्या कामातून मुक्त झाल्यानंतर आत्मचरित्र लिहिताना गिबनने व्यक्त केलेली ही भूमिका लक्षात घेण्यासारखी आहे.(९)

आत्मचरित्र म्हणजे त्याच्या लेखकाचा एकप्रकारे कबुली जबाबच असतो. आपल्या जीवनातील अपराधांची, चुकांची, कबुली देणे, त्या चुका प्रामाणिकपणे मान्य करणे ही भूमिकाही आत्मचरित्र लेखनामागे असू शकते. म.गांधींनी `सत्याचे प्रयोग` या आपल्या आत्मचरित्रात आपल्या अपराधांची कबुली दिली आहे. तर, रूसोने आपल्या आत्म-चरित्राला `कबुली जबाब` म्हणूनच संबोधिले आहे. सर्वप्रकारच्या बऱ्या-वाईट कृत्यांचा कबुलीजबाब दिल्यावर माणसाला प्रायश्चित घेतल्या-सारखेच वाटते, व त्यात एकप्रकारचे आत्मिक समाधान असते.

आपल्यासंबंधी निर्माण झालेले गैरसमज दूर करावेत, अशा हेतूनेही आत्मचरित्रलेखन करण्याचा प्रयत्न काही लेखक करीत असतात. त्याचप्रमाणे आपल्या अनुभवांना सजीव करावे, त्यांना आकार प्राप्त करून द्यावा, त्यांना शब्दरूप देऊन स्वतंत्र अस्तित्व प्राप्त करून द्यावे, अशीही आत्मचरित्र लेखनामागची भूमिका असते.

आत्मचरित्र : वाङ्.मयीन विशेष :

आत्मचरित्र म्हणजे एका विशिष्ट परिस्थितीमध्ये जगलेल्या किंवा अनुभविलेल्या क्षणांची नवनिर्मिती असते. आत्मचरित्रकाराने आपल्या आयुष्यातील निरनिराळे प्रसंग, अंत:करणातील निरनिराळी आंदोलने, विचार-अविचारांचा संघर्ष प्रामाणिकपणे वाचकापुढे मांडण्याचे ठरविले तर त्याचे आत्मचरित्र सत्याच्या जवळपास जाऊन यशस्वी होऊ शकते. त्यासाठी आत्मचरित्राच्या वाङ्.मयीन निकषांचा विचार करणे आवश्यक आहे.

अ) सत्यकथन :

आत्मचरित्रलेखनाच्या बाबतीत सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे

सत्यकथन. स्वत:च्या आयुष्यातील दुष्कृत्ये, मनात आलेले बरे-वाईट विचार, स्वत:च्या स्वभावातील दोष इत्यादी स्पष्टपणे सांगून आपल्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविणे हे आत्मचरित्रकाराकडून अपेक्षित असते पण त्याची सिध्दी फार कठीण आहे. आत्मचरित्रकार आपले जीवनानुभव तटस्थपणे सांगण्याचा प्रयत्न करतो. सत्यदर्शन ही तर त्याची कसोटी असते. यासाठी आत्मचरित्रकाराच्या ठिकाणी कठोर आत्मपरीक्षण आणि तटस्थवृत्ती असली पाहिजे. या संदर्भात अ.ना. देशपांडे म्हणतात, ' आत्मचरित्राचे निवेदन म्हणजे तारेवरची कसरत असते. आत्मश्लाघेचा व आत्मसमर्थनाचा आपल्यावर आरोप येणार नाही याबद्दल पदोपदी दक्षता बाळगावी लागते आणि त्याचबरोबर जास्तीतजास्त अलिप्तवृत्ती स्वीकारून आपल्या स्वभावविशेषांचे, गुणदोषांचे, आणि कर्तृत्वाचे यथातथ्य दर्शन घडवून देण्याची खटपट करायची असते. असे दुहेरी धोरण आत्मचरित्रकाराला सांभाळावे लागते. (१०) पण हे स्वत:बद्दलचे सत्य सांगणे म्हणावे तेवढे सोपे नसते. लेखकाला काही अप्रिय गोष्टी दडवण्याची इच्छा होते. तसेच प्रत्यक्षात न घडलेल्या गोष्टीही आत्मचरित्रात घुसडण्याचा मोह काही वेळा होत असतो. अशा सर्व प्रकारच्या मोहांवर विजय मिळवून स्वत:बद्दलचे सत्यकथन करणे ही तारेवरची कसरत असते आणि ती सत्याच्या खऱ्या उपासकालाच साधू शकते.

सत्यासत्याबाबत स्वत:च्या मनाला प्रमाण ठेवून केलेल्या आत्मकथनातही काही प्रमाणात सत्याला गळती लागणे शक्य असते. कारण आपल्या स्मरणातून अनेक गोष्टी निसटत असतात. त्यात आवडीनिवडीही येत असतात. त्यामुळे स्वत:विषयीचे संपूर्ण सत्य सांगण्यास कोणीही तसा असमर्थच असतो. आत्मचरित्रकाराला अर्धवट, अपूर्ण अशा सत्यावरच अखेर अवलंबून रहावे लागते. पण तो हे सर्व

प्रांजळपणे सांगत असतो. सौजन्य आणि सभ्यपणाच्या मर्यादा सांभाळूनही तो सत्याचा विपर्यास होऊ देत नाही. अशा सत्यकथित आत्मचरित्राला प्रत्ययकारिता प्राप्त होते. 'मानवी जीवनात अनेक घटना घडत असतात. आत्मचरित्रकार जीवनातील एका विशिष्ट टप्प्यावर थांबून या घटनांचे अवलोकन करीत असतो. पण हे करताना त्याच्या-जवळ तटस्थता नसेल तर त्याचे आत्मदर्शन सदोष होण्याची शक्यता असते. ही अलिप्तता स्वीकारून जेव्हा तो स्व-दर्शन घडवितो तेव्हा त्याच्या आत्मचरित्राला वाङ्.मयीन गुणवत्ता प्राप्त होते.

ब) <u>प्रामाणिकपणा</u> :

स्वत:चे दोष कबूल करण्यासाठी, आपल्या मनात आलेले बरे-वाईट विचार स्पष्टपणे मांडण्यासाठी, आत्मचरित्रकाराच्या ठिकाणी प्रामाणिकपणा असणे अतिशय गरजेचे आहे. अ.म. जोशी म्हणतात, "आपणास स्मरत असलेल्या सर्व गोष्टी ज्या योगे आपले व्यक्तित्व स्पष्टपणे उठून दिसेल अशा पध्दतीने लोकासमोर मांडणे हे आत्म-चरित्रकाराचे कर्तव्य होय. हे कर्तव्य पार पाडावयाचे म्हणजे आत्म-चरित्रकाराच्या अंगी प्रामाणिकपणा व तटस्थवृत्ती हे दोन गुण प्रामुख्याने असले पाहिजेत."(११) प्रामाणिकपणे व मनमोकळेपणाने आपल्या गुण-दोषाचे दर्शन आत्मचरित्रकाराने घडवायला हवे. आत्मचरित्रकाराने स्वत:बद्दल मत देण्याचे टाळायला हवे. इतकेच नव्हे, तर घडलेल्या घटनांची तर्कसंगती लावण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करणे, घटनांच्या कारणांचा शोध घेणे, टाळले पाहिजे. त्याने फक्त घटना-प्रसंग जसे घडले तसे सांगावे.

' आत्मचरित्रकाराजवळ प्रांजळपणा हा आवश्यक गुण पाहिजे.

ती असला म्हणजे असत्यकथन व विपर्यास टाळता येणे शक्य आहे.(१२) प्रांजळपणामुळे आत्मचरित्रकाराला चांगला दर्जा प्राप्त होऊ शकतो. आत्मचरित्रकाराने केलेले निवेदन प्रांजळ हवे. जिवलग मित्राशी ज्या विश्वासाने आणि मनमोकळेपणाने आपण बोलतो तशा भावनेने स्वत:च्या आयुष्याची कथा आत्मचरित्रकाराने सांगावी, निरर्थक उपचाराला आत्मकथनात स्थान देऊ नये. आत्मचरित्रकार आणि वाचक यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा दूरस्थपणा अथवा परकेपणा निर्माण झाला नाही, तरच आत्मचरित्रकाराला वाचकाच्या अंत:करणाच्या तारा छेडता येतील. प्रांजळपणे केलेल्या आत्मकथनाला कोणत्याही समर्थनाची आवश्यकता नसते.

क) <u>कलात्मक मांडणी :</u>

आत्मचरित्रातही कलात्मक मांडणी महत्त्वाची असते. म्हणून काय सांगावे, किती सांगावे, आणि कसे सांगावे याचे भान आत्म-चरित्रकाराला असले पाहिजे. तटस्थ आणि प्रामाणिक जीवन शोध आत्मचरित्रातून व्यक्त व्हावा अशी इच्छा असली तरी, हा शोध जर शब्दबंबाळ होणार असेल तर लेखनाची कलात्मकता उणावल्यावाचून रहाणार नाही. आत्मचरित्र सुटसुटीत, आटोपशीर असले पाहिजे. निरर्थक विस्ताराला त्यात अजिबात अवसर मिळता कामा नये. आरंभ, मध्य व शेवट असा एकसूत्रीपणा त्यात पाहिजे. आत्मचरित्रकार आपल्या जन्मापासून आपल्या आत्मचरित्रलेखनकालापर्यन्तची हकिकत लिहू शकत असला तरी त्या लेखनात सुसंगतता व सुसूत्रता असावी लागते. बालपण, तारुण्य, प्रौढत्व, वार्धक्य, अशा क्रमाने चरित्रवृत्तांत सांगून त्यामध्ये सुसूत्रता आणता येते. आत्मचरित्रात पुनरुक्तीही टाळायला हवी. त्यात तोचतोचपणा येता कामा नये. वरील सर्व गुणांचा अवलंब केल्यास

आत्मचरित्रात कलात्मकता येऊ शकेल.

ड) भावनाविष्कार :

सर्व वाङ्.मयप्रकारांमध्ये थोडयाफार प्रमाणात भावनांचा अविष्कार होत असतोच. त्याप्रमाणे आत्मचरित्रातही भावनाविष्काराला महत्त्व असते. आत्मचरित्रकार ज्या अनेक घटना कथन करीत असतो त्या विविध भावभावनांनीही भरलेल्या असतात. आत्मचरित्रात या भावनांचा आविष्कार होत असतो. आपल्या जीवनातील सुखदु:खाचे प्रसंग सांगत असताना त्यात भावसौंदर्य आपोआपच प्रकट होत असते. पण आत्म-चरित्रकाराने भावनेच्या आहारी मात्र जाऊ नये. त्यामुळे त्याच्या लिखाणात भावविवशता येण्याची शक्यता असते. भावनेपासून दूर जाऊन लिखाण केल्यास त्यात रूक्षता येते. म्हणून आत्मचरित्रकाराने भावना-शील असावे पण भावविवश असू नये.

इ) व्यक्तिचित्रण :

कोणत्याही ललितकलाकृतीत मानवी जीवन दर्शनाला अधिक महत्त्व असते. कारण मानवी जीवनाचे चित्रण करण्यासाठीच ललित-वाङ्.मयाचा जन्म झाला आहे. जीवनातला महत्त्वाचा घटक असलेला माणूस हा ललितकृतीच्या केंद्रस्थानी असतो. ललित वाङ्.मयात ज्या जीवनाचे चित्रण केलेले असते त्या जीवनाला रंग, रूप, आकार मिळतो तो मानवी स्वभावामुळे. म्हणून ललितकृतीतील जीवनचित्रण हे एका-दृष्टीने मानवी स्वभावाचे चित्रण असते.। हे स्वभावचित्रण वेगवेगळ्या वाङ्.मयप्रकारांमध्ये वेगवेगळ्या पध्दतीने येत असते. प्रत्येक वाङ्.मय-प्रकाराची प्रकृती भिन्न असल्याने स्वभावचित्रणात आपोआप बदल होत जातो. कथा, कादंबरी, नाटक इत्यादी वाङ्.मय प्रकारांमध्ये लेखकाला

स्वभावचित्रणाचे स्वातंत्र्य आहे. तसे स्वातंत्र्य आत्मचरित्रकाराला लाभत नाही. इतर ललितकृतींमध्ये स्वभावचित्रणात लेखकाला कल्पनेचा आश्रय घेता येतो, परंतु आत्मचरित्रकाराला आपली सत्यदर्शनाची भूमिका सोडून कल्पनेचा आश्रय घेता येत नाही. त्यामुळे इतर ललितकृतींतील स्वभावचित्रणाचे निकष आत्मचरित्रातील स्वभावचित्रणाला तंतोतंत लावणे योग्य होणार नाही.

आत्मचरित्रातील स्वभावदर्शन अधिक वास्तव व जिवंत असते. इतर कोणत्याही वाङ्मय प्रकारापेक्षा आत्मचरित्रातील व्यक्ती खऱ्याखुऱ्या व वास्तवातील असतात. वास्तवातील अशा व्यक्तींचे चित्र रंगविणे हे फारच अवघड असते. कारण सत्यदर्शनाचे एक फार मोठे परंतु आवश्यक असे बंधन आत्मचरित्रकाराला स्वीकारावे लागते. त्यामुळे आत्मचरित्रकार हा आपले चित्र रंगविण्यात जितका गुंततो तितका तो इतरांची चित्रे रंगविण्यात क्वचितच गुंततो. आत्मचरित्रकार आपल्या आयुष्यात आलेल्या व्यक्तींचे जेव्हा स्वभावचित्रण करतो तेव्हा त्याला आणखी एक मर्यादा पडते. त्या त्या व्यक्तींचे व्यक्तिचित्रण हे आत्मचरित्रकाराच्या दृष्टीतून आलेले असते. आत्मचरित्रकाराला त्या व्यक्ती जशा जाणवल्या, तशा त्या आत्मचरित्रात आलेल्या असतात. आत्मचरित्रात नायकाव्यतिरिक्त इतर पात्रांचे जे चित्रण आलेले असते ते संपूर्ण असत नाही. त्या पात्रांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व त्यांच्या वातावरणाची पार्श्वभूमी, कारणमीमांसा यांना तेथे वाव नसतो. ज्या ज्या प्रसंगाच्या संदर्भात त्यांचा संबंध आलेला असतो त्या त्या संदर्भातच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये प्रकट होत असतात. आत्मचरित्राच्या प्रकृतीमुळे असे घडणे अटळ असते.

आत्मचरित्रातील स्वभावरेखनात सर्वात अधिक महत्त्व असते, ते खुद्द आत्मचरित्रलेखकाला. कारण तोच या जीवनकथेचा नायक असतो. आत्मचरित्र हे लेखकाचेच चरित्र असल्याने त्यात त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे चित्रणच अधिकांशाने येणे स्वाभाविक असते. आत्मचरित्रात त्याचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व आपल्या नजरेसमोर उभे राहते. परंतु त्यातही एक धोका असतोच. स्वत:चे स्वभावचित्रण लेखकाने स्वत:च केले असल्याने त्यात एकांगीपणा येण्याचीही शक्यता असते. कारण स्वत:चे चित्र रेखाटणे ही एक अत्यंत कठीण अशी गोष्ट आहे.

आत्मचरित्रामागे आत्माविष्काराची प्रेरणा, आत्मजीवनाच्या अर्थपूर्णतेची अभिज्ञता, स्वानुभवांच्या निवडीची दृष्टी आणि स्वशैली-विषयक भान अशा गोष्टी प्रेरक असतात. शिवाय ऐतिहासिक साहित्य-कृतीप्रमाणे विशिष्टतेकडून सामान्यत्वाकडे जाण्याची त्याची क्षमता असते. म्हणून आत्मचरित्र हा एक ललितगद्य प्रकार मानला जावा असे रा.ग. जाधव यांना वाटते.(१३)

कथा, कादंबरी, नाटक, कविता यांच्या वाचनापेक्षा आत्म-चरित्राच्या वाचनामुळे मानवीस्वभावाबद्दलचे अधिकज्ञान होण्याची शक्यता असते. कारण आत्मचरित्र ही आपल्या सारख्याच हाडामांसाच्या माणसाने स्वत:ची सांगितलेली जीवनकथा असते. मानवी स्वभावाची विविधरूपे त्यात अविष्कृत झालेली असतात. आत्मचरित्रातील आत्म-शोधन व आत्मदर्शन जीवनावर असाकाही प्रकाश टाकते की त्या प्रकाशात जीवनातील किती तरी गूढरम्य स्थळे आपणाला दृग्गोचर होतात. त्यामुळे आपण अंतर्मुख बनतो. श्रेष्ठ वाङ्मयाच्या ठिकाणी वाचकाला अंतर्मुख करण्याचे सामर्थ्य असते.

ठ) समाजदर्शन :

आत्मचरित्रात लेखकाने स्वत:च्या जीवनाचे चित्रण केलेले असते. लेखक ज्या समाजात राहतो त्या समाजातील चालीरीती, रूढी-परंपरेचा त्या समाजाच्या श्रध्दा, संकेत याचा प्रभाव त्या व्यक्तीच्या मनावर पडतो. व्यक्तिदर्शनातून काही प्रमाणात त्या कालखंडाचेही दर्शन घडते. तसे पाहिले तर, समाजात वावरणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला स्वयंभू असे व्यक्तिमत्त्व नसते. स्वभोवतालच्या जीवनाचे संस्कार तिच्या मनावर होतात. सामाजिक परिस्थिती, वातावरण, आंदोलने, इत्यादीचे सादपडसाद तिच्या व्यक्तिमत्त्वावर उमटत असतात. त्यामुळे आत्मचरित्रपर लेखनात व्यक्तीसोबत भोवतालच्या समाजाचे प्रतिबिंब उमटणे अटळ असते. वि. वा. शिरवाडकर म्हणतात " जीवनाच्या ज्या परिसरात आपण वावरतो, त्या पासून साहित्य हे अलग काढता येईल हे शक्य नाही. साहित्यिकांची प्रतिभा कितीही आकाशमार्गी असली तरी त्याचे पात्र नव्हे, त्याचं सारंच जीवन पृथ्वीवर ठेवलेलं असतं, लेखकाचं व्यक्तिमत्त्व हे त्याच्या वाङ्‌मयाचं अधिष्ठान असतं, हे कोणीच नाकारत नाही. परंतु हे व्यक्तिमत्त्व सुध्दा सामान्यत: मानावं तितकं स्वयंभू आणि स्वतंत्र असत नाही. परिसरातील परिस्थितीचे नानाविध संस्कार त्याच्यावर होत असतात व त्या क्रिया-प्रतिक्रियातून त्याला विशिष्ट आकार, विशिष्ट रंग प्राप्त होतो."(१४) त्यामुळे कोणत्याही कलाकृतीत त्या त्या लेखकाच्या व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब उमटलेले असते तसे त्याच्या भोवतालच्या समाजाचेही प्रतिबिंब उमटलेले असते. आत्मचरित्राचा लेखक हा आपल्या काळाशी आणि समाजाशी अनेक नात्यांनी निगडित असतो. त्यामुळे त्याच्या सोबत तत्कालीन समाजाचेही चित्रण व आत्मचरित्रात येणे अटळ असते.

सामाजिक वास्तव, कलावंत आणि साहित्यनिर्मिती यांच्यातील परस्पर संबंध लक्षात घेता असे दिसून येते की, साहित्यातून समाजाचे जे प्रतिबिंब प्रकट होते ते कलावंताच्या व्यक्तिमत्त्वाच्या माध्यमातूनच. साहित्य हे जीवनाचे प्रतिनिधित्व करीत असते आणि जीवन हे बव्हंशी एक सामाजिक वास्तवच असते. या वास्तवापासून कोणताही साहित्यिक फार दूर जाऊ शकत नाही. ज्या समाजामध्ये तो वावरतो त्या समाजातील वातावरण, रूढी परंपरा, धर्म, संप्रदाय, आचार-विचार, तत्कालीन संकल्पना, या सर्वांचा प्रभाव त्याच्या मनावर पडत असतो. आणि साहित्य तर या मनाचा अविष्कार असते. म्हणून आत्मचरित्रामध्ये समाजजीवनाचे प्रतिबिंब पडणे अपरिहार्य असते.[१५] म्हणूनच आत्मचरित्र लेखन स्वकालीन इतिहासाचे, समाजाचे व थोर पुरुषाचे यथातथ्य ज्ञान जाता जाता पुढच्या पिढीला करून देते.[१६] असे म्हणावयास हरकत नाही.)

एकोणिसाव्या शतकातील आत्मचरित्रपर लेखन :

आत्मचरित्र लेखनाची कला इंग्रजी अमदानीत विकसित झाली. त्यापूर्वी प्राचीन मराठी कवींपैकी नामदेव, तुकाराम, जनाबाई, बहिणाबाई यांच्या अभंगांत आत्मचरित्रपरता असली तरी त्यांचे सर्वलक्ष पारलौकिकाकडे होते. पेशवाईच्या काळात नाना फडणवीसांनी आपले आत्मचरित्र लिहून ठेवले आहे. आत्यंतिक धर्मभावना आणि प्रखर कामभावना यांच्या कोंडीत सापडलेल्या आपल्या व्यक्तिमत्त्वाची कोंडी पेशव्यांच्या आपल्या बद्दलच्या लोभामुळे कशी फुटली आणि परिणामी आपण राजकारणाकडे कसे जुंपलो गेलो, याबद्दलचे निर्भीड आत्मनिवेदन आहे आणि आत्मपरीक्षण ही आहे.[१७] तथापि हे

आत्मचरित्र अत्यंत संक्षिप्त व त्रोटक आहे. गंगाधरशास्त्री पटवर्धन यांनी ही आत्मचरित्रपर लेखन केले आहे. विष्णुबुवा ब्रम्हचारी यांच्या ' वेदोक्त धर्मप्रकाश ' (१८५९) मध्ये आत्मचरित्रपर लेखनाच्या खुणा आढळतात. इ.स.१८७९ मध्ये वासुदेव बळवंत फडके यांचे आत्मचरित्र ' ज्ञानप्रकाशात ' प्रसिध्द झाले. त्यात त्यांनी आपली कैफियत मांडली आहे.

अर्वाचीन मराठी साहित्यात पहिला आत्मचरित्रपर ग्रंथ म्हणून रा.ब.दादोबा पांडुरंग यांच्या आत्मचरित्राचा उल्लेख करावा लागेल. स्वत: ठेवलेल्या दैनंदिनीच्या आधारे दादोबांनी आपल्या बालपणापासून ते वृध्दापकाळापर्यन्तच्या हकिकती यात सांगितल्या आहेत. अव्वल इंग्रजी अमदानीतील समाजस्थितीचे दर्शन या ग्रंथातून घडते. त्या आत्मचरित्राचे लेखन सलग झालेले नाही. त्रोटक स्वरूपाचे हे स्वजीवन आणि स्वकाल रेखाटन आहे. पांगारकरांच्या मते ' दादोबा पांडूरंग याचे हे आत्मचरित्र म्हणजे १८०० ते १८८२ या काळातील महाराष्ट्र समाजाचा, महाराष्ट्रीय विद्वानांचा, मराठी गद्याच्या वाढत्या काळाचा मनोरंजक इतिहास सांगणारे हे पुस्तक आहे.' (१८) धर्मचळवळीची आंदोलने सांगणारे ' अरूणोदय ' हे आत्मचरित्र इ.स.१८८७ मध्ये बाबा पद्मनजी यांनी लिहिले. तत्कालीन समाजजीवनातील धर्मसंघर्षाचे चित्र येथे रेखाटले आहे. या काळातील समाज-जीवन, धार्मिकवातावरण कसे होते हे या आत्मचरित्रावरून स्पष्ट होते. समतोलवृत्ती आणि प्रांजलपणा या गुणांनी नटलेले हे आत्मचरित्र आहे. याच काळात वि.दा.सावरकर यांनी प्रसिध्द इटालियन देशभक्त जोसेफ मॅझिनी यांच्या आत्मचरित्राचे भाषांतर करून तरूणांत राष्ट्रभक्ती जागृत केली. अशा बऱ्याच आत्मचरित्रांचे लेखन या काळात

झाले आहे. स्वकालीन समाजजीवनाचे चित्रण करत पुढच्या पिढीला मार्गदर्शन व्हावे असे या आत्मचरित्रलेखनाचे स्वरूप आहे. प्रबोधन करावे, गतायुष्यातील स्मृतींना उजाळा द्यावा व त्यांचे नि:संकोचपणे प्रकटीकरण करावे हे या कालखंडातील आत्मचरित्रलेखनाचे स्थूल विशेष दिसून येतात.

स्त्रियांचे आत्मचरित्रपर लेखन :

एकोणिसाव्या शतकातील स्त्री जीवन सामाजिक आणि मानसिक गुलामगिरीत अडकले होते. अशा प्रतिकूल परिस्थितीला तोंड देऊन आत्मविकास करून घेण्याचा प्रयत्न काशीताई कानिटकर, रमाबाई रानडे, पंडिता रमाबाई यांसारख्या काही स्त्रियांनी केला. या पैकी काहींनी आपली जीवनकहाणी सांगितली आहे.

या कालखंडातील स्त्रीने लिहिलेले पहिले आत्मचरित्र म्हणून रमाबाई रानडे यांच्या 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी (१९१०) या ग्रंथाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. मराठी साहित्यात एका स्त्री लेखिकेने लिहिलेले अव्वल दर्जाचे असे हे आत्मचरित्र होय.(१९) न्या.रानडे वारल्यानंतर त्यांच्या सहवासातील जीवनाची हकीकत या आत्मचरित्रात रमाबाईंनी सांगितली आहे. 'आपल्या वयाची २७ वर्षे ज्यांनी त्या विभूतीबरोबर त्यांची सहधर्मचारिणी या नात्याने 'सावली' प्रमाणे घालविली, ज्यांच्या अंगचे नैसर्गिक तेज शिक्षणाने व अतिथोर सहवासाने अनेक पटींनी वृध्दिंगत झाले व ज्यांचे मन रावसाहेबांच्या भक्तीत कायमचे गढून राहिले आहे, त्यांनी आपल्या दिगंतकीर्ती पतीच्या स्वभावाचे व आयुष्यक्रमाचे काढलेले चित्र आपणास पाहावयास मिळाल्याबद्दल महाराष्ट्रातील लोकांस अभिमान व समाधान

वाटणे साहाजिक आहे.[२०] नामदार गोखले यांचे हे उद्गार रमाबाईंच्या कर्तृत्वसंपन्न जीवनावर प्रकाश टाकतात. पत्नीने पती-बद्दल लिहिलेला हा मराठी साहित्यातील पहिला ग्रंथ आहे. पती हेच सर्वस्व मानणाऱ्या अत्यंत सुजाण व समंजस अशा साध्वीचे हे आत्मचरित्र न्या.रानडे यांच्या विशाल अंत:करणाचे जसे दर्शन घडविते, तसेच रमाबाईंची समर्पणशीलताही स्पष्ट करते. याचकाळात लक्ष्मीबाई टिळक यांचे 'स्मृतिचित्रे' (१९३६) हे आत्मकथन वाङ्मयगुणांनी संपन्न आहे. (१९३४ ते १९३६ या कालखंडात चार खंडात हे प्रसिध्द झाले आहे.) रे.नारायण वामन टिळक यांच्याशी संसार करताना आलेल्या अनुभवाचे प्रांजळपणे केलेले हे कथन आहे. या आत्मचरित्रातून तत्कालीन समाजस्थितीचे जसे दर्शन घडते, तसे लक्ष्मीबाई टिळकांच्या लाघवी स्वभावाचे आणि नर्मविनोदी वृत्तीचेही दर्शन वाचकांना होते. या पुढील काळात स्त्रियांचे आत्मचरित्र लेखन झाले. या काळातील स्त्री शिक्षण व स्त्री सुधारणा लक्षात घेता असे आत्मचरित्र लेखन होणे स्वाभाविकही होते. या आत्मचरित्रांतून लेखिकांच्या व्यक्तिमत्त्वाचे, तत्कालीन सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय, परिस्थितीचेही दर्शन घडते. ही आत्मचरित्रे साधी निरलंकृत अशा रूपात साकारलेली आहेत. एकोणिसाव्या शतकातील (आणि विसाव्या शतकातील उंबरठ्यावरील) सामाजिक आणि धार्मिक परिस्थितीचे दर्शन घडविण्यात ही आत्मचरित्रे यशस्वी झाली आहेत.

एकोणिसाव्या शतकातील आत्मचरित्रकार लेखनातून तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे दर्शन घडते. दादोबा पांडुरंग व बाबा पदमनजी यांच्या आत्मपर लेखनाचे स्वरूप तरी वरील प्रमाणे आहे.

या काळात ब-याच लोकांनी आत्मपर लेखन केले असले तरी त्यात स्वकालीन समाजदर्शनावरही अधिक भर दिसतो. त्यामुळे लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या आविष्काराला तेथे फार थोडा वाव राहिला आहे. स्वत:च्या व्यक्तिमत्त्व प्रकटनालाही प्राधान्य देऊन ही आत्मचरित्रे लिहिली गेलेली नाहीत. आपल्या लेखनाकडे पहाण्याची या लेखकांची दृष्टी सामाजिक उपयुक्ततेची होती. म्हणूनच अ.का. प्रियोळकर म्हणतात, ' दादोबांचे आत्मचरित्र त्यांच्या वैयक्तिक माहिती पेक्षाही त्यांच्या काळाच्या माहितीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.' (२१)

एकोणिसाव्या शतकात धर्म, संस्कृती, परंपरा, रूढी इत्यादी गोष्टींशी पाश्चात्य संस्कृतीचा परिचय झाल्यामुळे आपल्या सामाजिक जीवनात आमूलाग्र बदल होऊ लागला होता. याचा परिणाम व्यक्तिमनावर होणे अपरिहार्य होते. त्यामुळे आत्मचरित्रपर लेखनांतूनही या बदलत्या सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब उमटलेले आढळते.

आत्मचरित्र हा वाङ्.मयप्रकार व्यक्तिनिष्ठ असला तरी एकोणिसाव्या शतकातील आत्मचरित्रपर लेखन मात्र तत्कालीन घडामोडींची, बदलत्या सामाजिक जीवनाची, व काही प्रमाणात त्या लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देणारे आहे.

-----

## प्रकरण पहिले
### - संदर्भ -


1) Dr.D.G.Naik, 'Art of Autobiography'
Vidarbha Marathwada book Company, Poona
Page-11, 1962.

2) Encyclopaedia Britannica, Vol.2,
William Benton, Publisher, London,
Page 854, 1963.

3) Biography and society page 230
Edit-Daniel Bertaux,
sponsored by the international
sociological Association/ I.S.A. 1981

4) Encyclopaedia Britannica, Vol.2 (Chicago,
William Benton, 1969)

5) Andra Maurois, "Aspects of Biograph"
(C.U.P. 1929) P.71.

६) मालतीबाई बेडेकर, 'माझे आत्मचरित्र आणि मी'
ललित दिवाळी अंक, नोव्हें-डिसें. १९८०, पृ.४८

७) अ.म. जोशी, चरित्र आत्मचरित्र, सुविचार प्रकाशन मंडळ,
पुणे, द्वितीय आवृत्ती, १९६५, पृ.१०१.

८) डॉ. ल.रा.पांगारकर 'चरित्रचंद्र' प्रस्तावना.

९) अ.म.जोशी, `चरित्र आत्मचरित्र, सुविचार प्रकाशन, पुणे
दु.आ.१९६६, पृ.१०६.

१०) अ.ना. देशपांडे, `आधुनिक मराठी वाङ्.मयाचा इतिहास
भाग २, व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृती,
१९५८, पृ.५२.

११) अ.म. जोशी, चरित्र आत्मचरित्र, सुविचार प्रकाशन मंडळ,
पुणे, द्वितीय आवृती-१९६५, पृ.९४

१२) तत्रैव पृ.३४

१३) मराठी विश्वकोश, खंड दुसरा, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती
मंडळ, मुंबई, प्रथम प्रकाशन १९७६, पृ.११.

१४) वि.वा. शिरवाडकर, अध्यक्षीय भाषण, मुंबई उपनगर,
मराठी साहित्य संमेलन, अधिवेशन चौदावे, १९५६,
वीणा, मे १९६४, पृ.३१.

१५) डॉ. स.गं.मालशे (अनु.) साहित्य सिध्दांत,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई,
आवृती पहिली, मे १९८२, पृ.९१.

१६) अ.म. जोशी, `चरित्र आत्मचरित्र`
सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, द्वितीय आवृती,
१९६५, पृ.१२६.

१७) भीमराव कुलकर्णी "नाना फडणिसाचे आत्मचरित्र" प्रस्तावना, मराठी साहित्य पत्रिका, अं.२२१, एप्रिल-मे-जून, १९८२, पृ.१

१८) अ.ना. देशपांडे, "आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग-१, व्हीनस प्रकाशन, पुणे-२ पहिली आवृत्ती, १९५४, पृ.११४

१९) तत्रैव - पृ.११४

२०) भालचंद्र फडके, 'मराठी लेखिका चिंता आणि चिंतन', श्री विद्या प्रकाशन, पुणे-३०, प्रथम आवृत्ती, १९८०, पृ.१४१.

२१) अ.का.प्रियोळकर, रा.ब.दादोबा पांडुरंग, संपादकीय निवेदन, के.भि.ढवळे प्रकाशन, मुंबई, आवृत्ती पहिली, १९४७, पृ.४९.

---o---